ePaper
केजरीवालांची निर्दोष मुक्तता होताच भाजपाला दिलं खुलं आव्हान



वर्ष - 9 । अंक - 183 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™



पान 2 वरुन...
होळीसाठी वृक्षतोड केल्यास १ लाख दंड

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 28 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## शिखर बँक घोटाळा : सुनेत्रा पवारांसह ७० हून अधिक जणांना दिलासा

# अजितदादा, सुनेत्रा पवारांना क्लीन चिट

**महाईन्यूज । मुंबई**

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी, महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना महाराष्ट्र राज्य सहकारी बँक प्रकरणात दिलासा मिळाला आहे. हे प्रकरण बंद करण्याची शिफारस करणारा आर्थिक गुन्हे विभागाने (ईओडब्ल्यू) दाखल केलेला अहवाल विशेष न्यायालयाने शुक्रवारी स्वीकारला. त्यामुळे, माजी उपमुख्यमंत्री अजित पवार, सुनेत्रा पवार यांच्यासह ७० हून अधिक जणांविरुद्ध दाखल या प्रकरणाला पूर्णविराम मिळाला.**



या प्रकरणी कोणताही फौजदारी खटला तयार होत नाही, असेही खासदार आणि आमदारांविरुद्ध दाखल फौजदारी प्रकरणांचे कामकाज पाहणाऱ्या विशेष न्यायालयाचे न्यायाधीश महेश जाधव यांनी उपरोक्त निर्णय देताना स्पष्ट केले. ईओडब्ल्यूच्या या अहवालाला विरोध करणाऱ्या निषेध याचिका सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे आणि इतरांनी केल्या होत्या. त्या आणि सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) दाखल केलेला हस्तक्षेप अर्ज देखील विशेष न्यायालयाने फेटाळला.


मुंबई उच्च न्यायालयाने २०१९ मध्ये दिलेल्या आदेशानंतर या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता आणि प्रकरणाची चौकशी सुरू झाली होती. हा खटला सहकारी बँकांनी साखर कारखान्यांना दिलेल्या कर्जांशी संबंधित असून, त्यात पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा देखील समावेष होता. अजित पवार हे १९९५ पासून या बँकेच्या संचालकपदी होते. ईओडब्ल्यू आणि ईडीच्या आरोपांनुसार, अनेक साखर कारखान्यांना हेतुत: आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य दाखवण्यात आले आणि नंतर त्यांना नफ्यात नसलेली मालमत्ता (नॉन-परफॉर्मिंग ॲसेट) म्हणून घोषित करण्यात आले.

पुढे, ते अजित पवार यांच्यासह बँक अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांशी संबंधित असलेल्या कंपन्यांना कमी किमतीत विकण्यात आले. सातारा येथील जरंडेश्वर साखर सहकारी कारखान्याची विक्री, कारखाना खरेदी करण्यासाठी वापरलेला निधी जरंडेश्वर साखर मिल्स प्रायव्हेट लिमिटेड आणि जय ॲग्रोटेक या दोन कंपन्यांकडून आला, असा देखील आरोप तपासकर्त्यांनी केला होता. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या २००८ पर्यंत जय ॲग्रोटेकच्या संचालकपदी होत्या, तर त्यांचे काका राजेंद्र घाडगे जरंडेश्वर साखर कारखान्याचे संचालक होते.

### सत्ताबदल आणि प्रकरणाला वारंवार मिळालेली वळणे

या प्रकरणाला २०२० पासून अनेक वळणे मिळाली. महाविकास आघाडी सरकारच्या काळात, ईओडब्ल्यूने सर्वप्रथम याप्रकरणी कोणताही फौजदारी गुन्हा घडला नसल्याचा दावा करून प्रकरण बंद करण्याची शिफारस करणारा अहवाल न्यायालयात सादर केला होता. परंतु, २०२२ मध्ये राज्यात झालेल्या सत्ताबदलानंतर, ईओडब्ल्यूने प्रकरणाची पुन्हा चौकशी सुरू केली. जानेवारी २०२४ मध्ये, अजित पवार सत्ताधारी आघाडीत सामील झाल्यानंतर काही महिन्यांनी, तपास यंत्रणेने पुन्हा एकदा भूमिका बदलली. तसेच, या प्रकरणी कोणताही गुन्हा सिद्ध झालेला नाही आणि बँकेने कर्जाची १३४३ कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम वसूल केल्याचा दावा करून प्रकरण बंद करण्याची शिफारस करण्याचा अहवाल न्यायालयात दाखल केला.

दरम्यान, गेल्या महिन्यात २८ जानेवारी रोजी विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले. त्यानंतर, काही आठवड्यांनी, गुरुवारी पक्षाच्या राष्ट्रीय परिषदेत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी एकमताने निवड झाली. अजित पवार यांच्या मृत्यूनंतर तीन दिवसांनी ३१ जानेवारी रोजी सुनेत्रा यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती.



### ईडीच्या आरोपपत्रात पवार दाम्पत्याचा समावेश नाही

तक्रारदार सुरिंदर अरोरा आणि साखर कारखान्यांशी संबंधित इतरांनी दाखल या अहवालाला विरोध करणाऱ्या निषेध याचिका दाखल केल्या. त्यात, ईओडब्ल्यूने लिलाव प्रक्रियेतील अनियमितता आणि कारखाने ताब्यात घेतलेल्या कंपन्यांना सहकारी बँकांच्या प्रमुख पदांवर असलेल्यांशी जोडलेल्या व्यवहारांसह पुरावे दुर्लक्षित केल्याचा आरोप केला होता. दुसरीकडे, या प्रकरणाशी संबंधित ईडीच्या प्रकरणात, अजित आणि सुनेत्रा पवार यांच्यावर आरोपपत्र दाखल करण्यात आले नव्हते. मात्र, जुलै २०२५ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) नेते रोहित पवार यांना या प्रकरणी आरोपी म्हणून दाखवण्यात आले.

# होळीसाठी वृक्षतोड केल्यास १ लाख दंड

## विनापरवाना झाडे तोडणे गुन्हा; महापालिकेचा कडक इशारा

**महाईन्यूज । पुणे**

**शहरात होळीसाठी झाडांच्या फांद्या तोडण्याचे प्रकार होऊ नयेत, यासाठी पुणे महापालिका प्रशासन सतर्क झाले आहे. विनापरवाना झाडे तोडणे, जाळणे किंवा झाडांना कोणत्याही प्रकारे इजा करणे हा कायद्याने गुन्हा असून, अशा प्रकारांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा महापालिकेने दिला आहे.**






महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 2021 नुसार परवानगीशिवाय वृक्षतोड केल्यास संबंधित झाडाच्या मूल्याइतका दंड आकारला जाऊ शकतो. हा दंड एक लाख रुपयांपर्यंत असू शकतो. त्यामुळे होळीच्या निमित्ताने वृक्षतोड करू नये, असे स्पष्ट आवाहन करण्यात आले आहे.

शहरात काही ठिकाणी होळीसाठी झाडांच्या फांद्या कापणे किंवा झाडांची छाटणी करण्याचे प्रकार घडतात. मात्र, अशा कृतींमुळे पर्यावरणाची हानी होत असून, संबंधितांवर गुन्हा दाखल होऊ शकतो, असे महापालिकेने नमूद केले आहे. वृक्ष प्राधिकरणाकडून यासंदर्भात लक्ष ठेवले जाणार असून, तक्रार आल्यास तत्काळ कारवाई केली जाणार आहे.

> पर्यावरणपूरक पद्धतीने होळी सण साजरा करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा आणि शहरातील झाडांचे संरक्षण करावे.
>
> \- अशोक घोरपडे, उद्यान विभागप्रमुख.

### ...येथे करा तक्रार

विनापरवाना वृक्षतोड किंवा झाडांना हानी होत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी तत्काळ तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तक्रारींसाठी 18001030222 हा टोल-फ्री क्रमांक, 9689900002 हा व्हॉट्सअॅप क्रमांक तसेच WWW.MAHAFOREST.GOV.IN या संकेतस्थळाचा उपयोग करता येणार आहे.

# सातवीतील मुलीवर फार्महाऊसमध्ये अत्याचार; गर्भधारणेतून प्रकार उघड

**महाईन्यूज । पुणे**

**तेरा वर्षांच्या मुलीवर अत्याचार करून तिला गर्भवती करणाऱ्या कामगाराला पुण्याच्या विशेष न्यायालयाने वीस वर्षे सक्तमजुरी आणि अकरा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. पीडिता व तिच्या आईने दिलेली साक्ष आणि डीएनए चाचणीत आरोपी हाच अर्भकाचा जैविक पिता असल्याचे सरकार पक्षाने सिद्ध केल्यानंतर विशेष न्यायाधीश सुचेता टाकळीकर यांनी हा निकाल दिला.**






बजरंग रामचंद्र खोपडे (वय ३५, रा. तेलवडी, भोर) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरोधात पीडित मुलीच्या आईने राजगड पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. ही घटना नोव्हेंबर २०१८ मध्ये राजगड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका अॅग्रो टुरिझम फार्मवर घडली होती.

त्या वेळी पीडित मुलगी सातव्या इयत्तेत शिकत होती. तिची आई फार्मवर स्वयंपाकाचे काम करीत असे. दिवाळीनिमित्त घरी पाहुणे आले असल्याने, पीडित मुलगी आईला बोलविण्यासाठी फार्मवर गेली. त्या वेळी आरोपीने पीडित मुलीला जबरदस्तीने खोलीत नेऊन तिच्यावर अत्याचार केले. आरोपीने पीडितेला या प्रकाराची वाच्यता केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर चार महिन्यांनी मार्च २०१९मध्ये पीडित मुलगी शाळेत असताना तिला चक्कर आली.

### पीडिता गर्भवती असल्याचे उघड

त्यामुळे आईने तिला डॉक्टरांकडे नेले असता, ती गर्भवती असल्याचे निदर्शनास आले. आईने मुलीला विश्वासात घेऊन विचारपूस केल्यानंतर हा प्रकार उघड झाला. त्यामुळे पीडितेच्या आईने पोलिसांकडे धाव घेतली. पोलिसांनी आरोपीला अटक करून त्याच्याविरोधात आरोपपत्र दाखल केले, तर पीडितेचा गर्भपात करण्यात आला.



### पीडितेला भरपाई देण्याचेही आदेश

या खटल्यात विशेष सरकारी वकील अरुंधती ब्रह्मे यांनी बारा साक्षीदार तपासले. त्यामध्ये पीडित मुलगी व तिच्या आईची साक्ष महत्त्वाची ठरली. डीएनए चाचणीत आरोपी हाच अर्भकाचा जैविक पिता असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीने अत्यंत घृणास्पद कृत्य केले असून, समाजात योग्य संदेश देण्यासाठी त्याला कठोर शिक्षा ठोठावण्यात यावी, असा युक्तिवाद विशेष सरकारी वकील अरुंधती ब्रह्मे यांनी केला. तो ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला शिक्षा व दंड सुनावला. दंडाच्या रकमेतील दहा हजार रुपये पीडितेला भरपाई स्वरूपात देण्यात यावे; तसेच पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने पीडितेला नियमानुसार भरपाई द्यावी, असेही न्यायालयाने निकालात म्हटले आहे.

# महापालिकेची 'अभय योजना' १ मार्चपासून सुरू

## थकबाकीदारांना मोठा दिलासा: करावरील विलंब दंडावर ९० टक्के सवलत

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरातील मिळकत कर थकबाकीदारांना मोठा दिलासा देणारी 'अभय योजना' १ मार्चपासून सुरू होणार आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेने या करावरील विलंब दंडावर तब्बल ९० टक्के सवलत मिळणार असल्याचे महापौर रवी लांडगे यांनी जाहीर केले आहे. महापौर कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेमध्ये महापौर रवी लांडगे यांनी ही घोषणा केली आहे. यावेळी सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, उपमहापौर शैलजा बाबर, विरोधी पक्षनेता भाऊसाहेब भोईर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष योगेश बहल हे उपस्थित होते.**



महापौर रवी लांडगे म्हणाले की, पिंपरी चिंचवड शहराच्या विकासासाठी मालमत्ताकर हा महत्त्वाचा महसूल स्त्रोत आहे. रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य सेवा, शिक्षण, स्वच्छता आणि इतर नागरी सुविधा नागरिकांच्या मालमत्ता करातूनच उभ्या राहत आहेत. वेळेत कर भरणे ही प्रत्येक जबाबदार नागरिकाची कर्तव्यभावना असून, नागरिकांच्या करातूनच शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य सेवा व इतर विकासकामे उभी राहत असतात. आतापर्यंत शहरातील ५ लाखांहून अधिक मालमत्ताधारकांनी प्रतिसाद देत सुमारे ७४७ कोटी रुपयांचा मालमत्ता कर भरला आहे. वसुली मोहिमेला अधिक गती देण्यासाठी महापालिकेच्या १८ विभागीय कार्यालयांमार्फत विशेष पथके कार्यरत असून थकबाकीदारांशी थेट संपर्क साधला जात आहे. तसेच वर्तमानपत्र, सोशल मिडीया व विविध माध्यमातुन मालमत्ता कर भरण्याचे नागरिकांना आवाहन करणेत येत आहे.



तसेच, शहरातील एकूण सुमारे २ लाख १२ हजार ४४० थकबाकीदारांनी अद्यापही थकीत मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही. या थकबाकीदारांनी विलंब न करता त्वरित संपूर्ण रकमेचा भरणा करावा असे आवाहन महापालिका प्रशासनामार्फत वेळोवेळी केले जाते.

> महापालिकेची 'अभय योजना' ही नागरिकांना दिलेला विश्वासाचा शब्द आहे. थकबाकीमुळे वाढलेला आर्थिक ताण कमी करण्यासाठी ९० टक्के मनपा करावरील विलंब दंडावर सवलत देण्यात येत आहे. शहराच्या विकासात प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा आहे. त्यामुळे ही मर्यादित कालावधीची संधी साधून ३१ मार्चपूर्वी थकीत मालमत्ता कर भरावा.
>
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका.

### विशेष सवलत :-


- पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत थकीत मालमत्ताकर वसुलीस गती देण्यासाठी व थकीत मालमत्ता कर वसुल होणे करीता दि. ०१ मार्च २०२६ पासून विशेष 'अभय योजना' सुरू करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत निवासी, बिगरनिवासी तसेच औद्योगिक व मोकळ्या जागा यांची थकबाकी एकरकमी भरल्यास मनपा कर विलंब दंडावर तब्बल ९० टक्के सवलत दिली जाणार आहे. ही योजना ३१ मार्च २०२६ पर्यंत मर्यादित कालावधीसाठी लागू राहणार आहे.
- मालमत्ताकराची थकबाकी प्रलंबित असलेल्या मालमत्ताधारकांसाठी ही मोठी आर्थिक दिलासा देणारी योजना ठरणार आहे. आर्थिक वर्ष २०२५ – २०२६ मधील थकबाकीसह संपूर्ण रक्कम एकरकमी भरल्यासच या सवलतीचा लाभ घेता येणार असून, दि. ०१ मार्च ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत पूर्ण भरणा करणे आवश्यक आहे.

# समाविष्ट भागाला लवकरच स्वच्छ पाणीपुरवठा; महेश लांडगे यांचा पाठपुरावा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या भागांना लवकरच स्वच्छ व सुरळीत पाणीपुरवठा होणार आहे. यासाठी आंद्रा धरण येथून अधिक प्रवाहाने पाणी सोडण्याचे तसेच इंद्रायणी नदी पात्रातील निघोजे बंधारा तातडीने स्वच्छ करण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.**





पिंपरी-चिंचवड शहराला मावळ परिसरातील पवना धरण आणि आंद्रा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. आंद्रा धरणातून सोडण्यात येणारे पाणी निघोजे बंधाऱ्यामार्गे इंद्रायणी नदीतून उचलून चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया करून समाविष्ट भागातील नागरिकांना वितरित केले जाते.

मात्र मोशी, चिखली, चऱ्होली, चोविसावाडी, डुडुळगाव आणि बोऱ्हाडेवाडी परिसरात गेल्या काही दिवसांपासून दुर्गंधीयुक्त व अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याची बाब आमदार महेश लांडगे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित केली. दूषित पाण्यामुळे नागरिक त्रस्त असल्याचे त्यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले.

यासंदर्भात आमदार लांडगे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची प्रत्यक्ष भेट घेऊन संपूर्ण परिस्थिती मांडली. त्यानंतर मंत्र्यांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना दूरध्वनीवरून सूचना देत, आंद्रा धरणातून अधिक प्रवाहाने पाणी सोडण्याचे व निघोजे बंधारा त्वरित स्वच्छ करण्याचे आदेश दिले.

तसेच या विषयावर तालिका अध्यक्ष समाधान अवताडे यांनीही शासनाला तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

> आंद्रा धरणातून अधिक प्रवाहाने इंद्रायणी नदीत पाणी सोडले जाईल. निघोजे बंधारा जलसंपदा विभागाकडून तातडीने स्वच्छ करण्यात येईल. त्यामुळे समाविष्ट भागातील नागरिकांना स्वच्छ व सुरळीत पाणीपुरवठा होईल. पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना स्वच्छ व पुरेसा पाणीपुरवठा करण्यासाठी राज्य शासन आणि महापालिका कटिबद्ध आहेत. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे शहराच्या वतीने आभार मानतो.
>
> - महेश लांडगे, भोसरी विधानसभा आमदार, भारतीय जनता पार्टी.



## भूमिका

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दोन दिवसांचा ISRAEL दौरा अनेक अर्थांनी महत्त्वाचा ठरला आहे. या भेटीमुळे भारत-इस्रायल संबंध अधिक बळकट आणि व्यापक होत असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. दोन्ही देशांनी संरक्षण, तंत्रज्ञान, कृषी, सायबर सुरक्षा, ऊर्जा संशोधन, मुक्त व्यापार आणि समुद्री संपत्ती विकास अशा विविध क्षेत्रांत सहकार्य वाढविण्यासाठी करार आणि सामंजस्य करार केले.**

# भारत-इस्रायल मैत्रीचा नवा अध्याय



त्यामुळे भविष्यातील द्विपक्षीय संबंधांची दिशा अधिक स्पष्ट झाली आहे. विशेषतः संरक्षण क्षेत्रातील सहकार्य भारताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.
आज इस्रायल हा भारताचा तिसऱ्या क्रमांकाचा शस्त्रपुरवठादार देश बनला आहे. अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञान, क्षेपणास्त्र प्रणाली आणि देखरेख यंत्रणा या बाबतीत इस्राएलचे कौशल्य जगभर मान्य आहे. भारताने इस्राएलसमवेत प्रत्यक्ष शस्त्रखरेदीपेक्षा तंत्रज्ञान हस्तांतरणावर भर देण्याची भूमिका घेतली आहे.
या संदर्भात दोन महत्त्वाचे करार झाल्याची माहिती पुढे येत आहे. त्यांची सविस्तर माहिती प्रसिद्ध झाल्यानंतर त्याचे नेमके स्वरूप स्पष्ट होईल, परंतु दीर्घकालीन दृष्टीने स्वदेशी संरक्षण क्षमतावृद्धीसाठी हे सहकार्य उपयुक्त ठरणार आहे.
इस्रायलची क्षेपणास्त्र सुरक्षा व्यवस्था, विशेषतः ARROW MISSILE SYSTEM सारख्या प्रणाली, भारताच्या संरक्षण व्यवस्थेत आधीपासूनच समाविष्ट आहेत. दहशतवादविरोधी कारवायांमध्ये आणि सीमासुरक्षेसाठी या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर झालेला आहे.
त्यामुळे संरक्षण क्षेत्रातील परस्पर विश्वास अधिक दृढ झाला आहे.
या दौऱ्यापूर्वी काही राजकीय पक्षांनी आणि तथाकथित विचारवंतांनी त्यावर टीका केली. पॅलेस्टाईनचा प्रश्न, गाझा पट्टीतील परिस्थिती आणि 7 ऑक्टोबर 2023 रोजी HAMAS ने इस्रायलवर केलेला हल्ला या मुद्द्यांवरून राजकीय वातावरण तापविण्याचा प्रयत्न झाला.
तथापि, भारताने नेहमीच संतुलित परराष्ट्र धोरण स्वीकारले आहे.
इस्रायलशी संबंध दृढ करतानाच भारताने गाझा पट्टीतील शांतता प्रक्रियेला पाठिंबा दर्शविला आहे. त्यामुळे भारताची भूमिका एकांगी नसून व्यावहारिक आणि समतोल आहे, हे अधोरेखित होते. इतिहास पाहिला तर भारताने 1992 मध्ये इस्रायलशी अधिकृत राजनैतिक संबंध प्रस्थापित केले. त्यापूर्वी इस्रायलविषयी भारताची भूमिका मर्यादित होती. मात्र इस्रायलने कृषी, पाणी व्यवस्थापन, संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रात साधलेली प्रगती पाहता भारताने आपले धोरण बदलले. त्यानंतर विविध सरकारांनी इस्रायलशी सहकार्य कायम ठेवले. आज विरोधात असलेले काही पक्षी सत्तेत असताना इस्रायलशी संरक्षण आणि तांत्रिक सहकार्य वाढवत होते, ही वस्तुस्थिती लक्षात घेण्यासारखी आहे. कृषी क्षेत्रातही इस्रायलचे योगदान महत्त्वाचे आहे. कमी पाण्यात अधिक उत्पादन घेण्याच्या तंत्रज्ञानात इस्रायल अग्रेसर आहे.
भारतातील अनेक राज्यांत इस्रायली पद्धतींचा अवलंब करून शेती उत्पादनवाढ साधली आहे. ठिबक सिंचन, जलव्यवस्थापन आणि उच्च दर्जाची बियाणे तंत्रज्ञान या क्षेत्रांत भारत-इस्रायल सहकार्य फलदायी ठरले आहे. परराष्ट्र धोरण हे मतपेटीच्या राजकारणावर आधारलेले नसावे, तर राष्ट्रीय हितावर आधारित असावे लागते. इस्रायलचे पॅलेस्टाईनशी संबंध किंवा प्रादेशिक राजकारण हा त्यांचा स्वतंत्र विषय आहे. भारताने आपल्या हितसंबंधांचा विचार करून सहकार्य वाढवणे हेच शहाणपणाचे आहे. इस्रायलसारख्या प्रगत आणि सामरिकदृष्ट्या सक्षम देशाशी मैत्री दृढ केल्याने भारताच्या संरक्षण, तंत्रज्ञान आणि आर्थिक क्षमतांना चालना मिळू शकते.

## प्रासंगिक »

### स्वार्थ

***एका मांजराने आपल्या मालकाचा आवडता पोपट मारून खाल्ला. तेव्हा मालकाने, 'ते मांजर दिसले तर मारून टाकीन' असे रागाने म्हटले.***

ते ऐकताच मांजर इतके घाबरले की ह्या प्रसंगातून देवाने आपल्याला वाचविले तर पुढे आपण कोणताही पक्षी कधीही मारून खाणार नाही अशी प्रतिज्ञा केली. एकीकडे भूक व दुसरीकडे प्रतिज्ञाभंग होण्याची भिती अशा पेचात ते सापडले असता काही वेळाने आपली भूक भागविण्याची एक युक्ती त्याला आढळून आली. वटवाघूळाकडे पाहून ते आपल्याशीच म्हणाले, 'हा पक्षी आहे असं जर मानलं तर केलेल्या प्रतिज्ञेप्रमाणे याला हात लावण्याचा अधिकार मला नाही, पण याच्या तोंडाचं उंदराच्या तोंडाशी इतकं साम्य आहे की, याला मारून खाण्याचा अधिकार मला आहे.' इतके बोलून तिने त्या वटवाघूळाला खाऊन टाकले.

तात्पर्य :
स्वार्थ साधण्याची वेळ आली असता लबाड लोक आपली प्रतिज्ञा युक्तीने गुंडाळून ठेवतात.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'स्टेट ऑफ द युनियन' (SOTU) भाषणाने यंदा अपेक्षेपेक्षा अधिक राजकीय रंग घेतला. अमेरिकी परंपरेनुसार अध्यक्ष युनाइटेड स्टेट्स काँग्रेसच्या संयुक्त बैठकीसमोर देशाची स्थिती, आव्हाने आणि धोरणांची दिशा मांडतात.

# स्वतःमध्येच मग्न असणाऱ्या अध्यक्षाचे आव्हान

सेनेट आणि हाउस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह्ज सदस्यांसमोर केले जाणारे हे भाषण केवळ औपचारिक नसून आगामी राजकारणाची दिशा ठरवणारे असते.
ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळातील हे महत्त्वाचे भाषण तीन कारणांनी विशेष ठरले—एक म्हणजे गेल्या वर्षी सत्तेवर आल्यानंतर त्यांना धोरणात्मक मांडणीसाठी पुरेसा वेळ मिळाला नव्हता; दुसरे म्हणजे भाषणापूर्वी सर्वोच्च न्यायालयाकडून मिळालेला धक्का; आणि तिसरे म्हणजे येऊ घातलेल्या मध्यावधी निवडणुका. आगामी निवडणुकांआधी हा स्थलांतरितांचा मुद्दा जितका जमेल तितका तापवावा हा त्यांचा उद्देश. त्यात गैर काही नाही. फक्त स्थळ तितके योग्य नव्हते इतकेच. अध्यक्षांच्या चार वर्षांच्या कार्यकाळाच्या मध्यावर होणाऱ्या या निवडणुकांमध्ये सेनेट आणि प्रतिनिधीगृहातील जागांवर मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर हे भाषण प्रचाराचे रणशिंग ठरले.
परंतु अपेक्षित आर्थिक दृष्टीकोन



मांडण्याऐवजी ट्रम्प यांनी बहुतांश वेळ विरोधी डेमॉक्रॅटिक पार्टीवर टीका करण्यात घालवला. डेमॉक्रॅट्सनी 'अफोरडीबिलिटी'—म्हणजे परवडणारी जीवनशैली—हा मुद्दा पुढे रेटत महागाई, घरे, रोजगार आणि वेतन या प्रश्नांवर जनमत तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. याला प्रत्युत्तर देताना ट्रम्प यांनी या भूमिकेला "नवे खूळ" ठरवले आणि डेमॉक्रॅट्स नागरिकांना भ्रमित करत असल्याचा आरोप केला. मात्र यामुळे तो मुद्दा अधिक अधोरेखित झाल्याचेच भासले.
आर्थिक धोरणांवरील स्पष्ट आराखडा मांडण्याऐवजी ट्रम्प यांनी स्थलांतराचा मुद्दा वारंवार उचलला. आगामी निवडणुकांपूर्वी हा विषय तापवण्याचा त्यांचा प्रयत्न स्पष्ट दिसला. दरम्यान, त्यांच्या लोकप्रियतेत घट झाल्याच्या पार्श्वभूमीवर ठोस उपाययोजना अपेक्षित होत्या; त्या मात्र भाषणात दिसल्या नाहीत.
दूरचित्रवाणीवरील अनुभवाचा प्रभाव भाषणात जाणवला. एका बर्फावरील हॉकी संघाचा सन्मान, लष्करी अधिकाऱ्यांचे विशेष उल्लेख, जखमांचे भावनिक वर्णन—या गोष्टींमुळे राष्ट्रवादाची भावना चेतवण्याचा प्रयत्न दिसला. मात्र या नाट्यमयतेत धोरणात्मक सखोलता कमी भासली. एकूणच, 'सोटू' भाषण हे देशाच्या स्थितीचे चिंतन कमी आणि निवडणुकीची पूर्वतयारी अधिक असे चित्र निर्माण करणारे ठरले. ठोस आर्थिक दिशा देण्याऐवजी राजकीय ध्रुवीकरणाला खतपाणी घालण्याचा सूर त्यात अधिक प्रकर्षाने जाणवला.

## ।। अभंगवाणी ।।



अगत्य ज्या नरका जाणें । वीट मानणे कीर्तने ॥१॥
नावडेसा झाला बाप । आलें पाप वस्तीसि ॥ध्रु.॥

नारायण नाहीं वाचे । ते यमाचे अंदण ॥२॥
तुका म्हणे अभक्तासी । माता दासी जगझोडी ॥३॥
- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# रोहित पवारांची मुख्यमंत्र्यांसोबत भेट

## अजितदादांच्या विमान अपघाताच्या चौकशीच्या मागणीबद्दल चर्चा

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा २८ जानेवारी २०२६ रोजी विमान अपघातात मृत्यू झाला. व्हिएसआर कंपनीच्या विमानाने ते मुंबईहून बारामतीकडे प्रवास करत होते. मात्र बारामती विमानतळावर लँडिंगपूर्वी धावपट्टीच्या सुरुवातीला विमान कोसळून मोठा अपघात झाला. या घटनेनंतर अपघाताची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी राज्यातील अनेक नेते आणि कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. आमदार रोहित पवार यांनीही ही मागणी लावून धरली आहे.**



### अपघातामागे मोठ्या व्यक्तीचा हात

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी या अपघाताबाबत एक खळबळजनक विधान केले आहे. "या अपघातामागे नक्कीच कोणत्या तरी मोठ्या व्यक्तीचा हात आहे," असे म्हणत त्यांनी अपघाताची तांत्रिक बाबींबरोबरच गुन्हेगारी अंगानेही चौकशी करण्याची मागणी केली आहे. बुधवारी मुंबईतील मरीन ड्राइव्ह पोलिसांनी डीजीसीएविरोधात एफआयआर दाखल करण्यास नकार दिल्यानंतर रोहित पवार गुरुवारी बारामती येथील पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यासाठी पोहोचले होते. तेथे त्यांनी आपली भूमिका मांडल्यानंतर पोलिसांनी त्यांच्या मागणीवर विचार करण्यासाठी वेळ मागितला होता. त्यानंतर माध्यमांशी बोलताना रोहित पवार यांनी हे दावे केले होते.

### रोहित पवार काय म्हणाले?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्यानंतर रोहित पवार यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, अजितदादांच्या अपघाती मृत्यूप्रकरणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन या अपघाताबाबत त्यांच्याकडे असलेली सविस्तर माहिती दिली. या अपघाताचा तपास करताना संपूर्ण पारदर्शकता राखली जाईल, असे मुख्यमंत्री यांनी आश्वासन दिल्याचे त्यांनी सांगितले. तसेच अजितदादांच्या स्मारकाबाबतचे पत्रही त्यांनी मुख्यमंत्री महोदयांना दिले. या विमान अपघातात मृत्यू झालेल्या सुरक्षा कर्मचारी, क्रू मेंबर आणि सह-पायलट यांच्या कुटुंबीयांच्या मागण्यांबाबतही त्यांनी चर्चा केली.

### तीन मुख्य मागण्या कोणत्या?

आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेताना रोहित पवार यांनी तीन प्रमुख मागण्या मांडल्या. पहिली मागणी म्हणजे अजित पवार यांच्या विमान अपघाताची सर्वंकष, पारदर्शक आणि सखोल चौकशी करावी. दुसरी मागणी म्हणजे अजित पवार यांचा सहवास लाभलेल्या 'देवगिरी' बंगल्याचे संग्रहालय व स्मारकात रूपांतर करावे, तसेच राज्यातील काही महत्त्वाच्या प्रकल्पांना आणि महामार्गांना त्यांचे नाव द्यावे. तिसरी मागणी म्हणजे २८ जानेवारी २०२६ रोजी बारामती येथे झालेल्या या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत द्यावी, तसेच त्यांच्या मुलांना किंवा त्यांच्या आश्रितांना आवश्यक ती मदत करावी.

# राज्यसभेसाठी भाजपाचे कोणाच्या नावावर शिक्कामोर्तब?

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यातून निवडून देण्याच्या राज्यसभेच्या सात जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत महाविकास आघाडीचा एक उमेदवार निवडून येऊ शकतो. मात्र या एका जागेवरून महाविकास आघाडीत रस्सीखेच सुरू असून, त्यावर अद्याप तोडगा निघू शकलेला नाही. राज्यसभेच्या निवडणुकीसाठी भाजपाच्या वाट्याला चार जागा येणार असून, यासाठी २५ नेते इच्छूक असल्याचे सांगितले जात आहे.**



### या बाबतचा निर्णय लवकरच घेतला जाणार

भाजपाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत फायनल करण्यात आलेल्या नावांवर दिल्लीत शिक्कामोर्तब केले जाणार आहे. राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी ३ मार्चपासून सुरुवात होणार आहे. त्यामुळे या बाबतचा निर्णय लवकरच घेतला जाणार असल्याचे समजते. या नावांमधून भाजप नेतृत्व कोणाची निवड करणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

यासंदर्भात भाजपाच्या कोअर कमिटीची एक बैठकही झाली होती. याबाबत भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे.

रविंद्र चव्हाण दिल्लीत असून, पत्रकारांशी बोलताना त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. राज्यसभेसाठी इच्छुक असलेल्या २५ जणांच्या नावाची यादी कोअर कमिटीच्या बैठकीत फायनल करण्यात आली होती. राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी ३ मार्चपासून सुरुवात होणार आहे. त्यामुळे या बाबतचा निर्णय लवकरच घेतला जाणार असल्याचे समजते. ही २५ जणांच्या नावाची यादी घेऊन भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण तातडीने दिल्लीत दाखल झाले होते. या नावावर शुक्रवारी दिल्ली दरबारी चर्चा झाली. राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्यासोबतच्या बैठकीनंतर या चार नावांची घोषणा दिल्लीतून २ मार्च रोजी करण्यात येणार असल्याची माहिती रवींद्र चव्हाण यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. त्याबाबतचा निर्णय भाजपाची केंद्रीय समिती घेणार असल्याचेही चव्हाण यांनी स्पष्ट केले.

दोन दिवसापूर्वी राज्यात झालेल्या भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, रावसाहेब दानवे, चंद्रशेखर बावनकुळे, सुधीर मुनगंटीवार, पंकजा मुंडे, गिरीश महाजन, अतुल सावे, आशिष शेलार, अमित साटम उपस्थित होते. भाजपच्या या यादीत विनोद तावडे, रावसाहेब दानवे, डॉ. भागवत कराड, विजया रहाटकर, डॉ. भारती पवार, प्रीतम मुंडे, दिलीप कांबळे, अमर साबळे, रणजितसिंह नाईक निंबाळकर, कुणाल पाटील, माधव भांडारी अशी काही नावे असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात असल्याचे सांगितले जात आहे.

# पाकिस्तानचे अफगाणिस्तानविरुद्ध ‘गजब-लील-हक’ ऑपरेशन...

## पाकिस्तानच्या या ऑपरेशनच्या नावावरून सध्या जगभरात चर्चेला उधाण

महाईन्यूज । इस्लामाबाद

**पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील तणाव आता एका धोकादायक वळणावर येऊन पोहोचला आहे. पाकिस्तानने अफगाणिस्तानविरुद्ध ‘गजब-लील-हक’ नावाचे लष्करी अभियान सुरू केल्याचा दावा केला आहे. या ऑपरेशनच्या नावावरून सध्या जगभरात मोठी चर्चा सुरू असून, या शब्दाचा नेमका अर्थ आणि त्यामागची पाकिस्तानची रणनीती काय आहे?**





अफगाणिस्तानमधील तालिबान सरकार सीमावर्ती भागात विनाकारण गोळीबार करत असून 'टीटीपी' सारख्या दहशतवादी गटांना आश्रय देत आहे, असा आरोप पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ आणि मंत्री अताउल्ला तरार यांनी केला आहे. पाकिस्तानने आता आपली संयमाची सीमा ओलांडली असल्याचे त्यांनी म्हटले असून, याला 'ओपन वॉर' असे संबोधले आहे.

या ऑपरेशनचा मुख्य उद्देश असा की, तालिबानला इशारा देणे आहे, पाकिस्तान आता केवळ सीमेवर रक्षण करणार नाही, तर अफगाणिस्तानच्या आत घुसून हल्ला करण्यास मागेपुढे पाहणार नाही, असे त्यांना दाखवायचे आहे.

### 'गजब-लील-हक'चा अर्थ काय?

तज्ज्ञांच्या मते, पाकिस्तानने या मोहिमेला दिलेले नाव केवळ तांत्रिक नसून त्याला धार्मिक आणि लष्करी आधार आहे. ‘गजब-लील-हक’ हा अरबी भाषेतील शब्दसमूह असून त्याचा अर्थ खालीलप्रमाणे होतो:

**गजब (GHAZAB):** प्रचंड संताप किंवा ईश्वरी प्रकोप.

**लिल (LIL):** साठी.

**हक (HAQ):** सत्य किंवा न्याय.

म्हणजेच, ‘सत्य आणि न्यायासाठी ईश्वरी प्रकोप’ असा याचा अर्थ होतो. या नावाच्या माध्यमातून पाकिस्तानला असे दाखवायचे आहे की, त्यांचा हा हल्ला पूर्णपणे न्यायासाठी असून ते सत्याच्या रक्षणासाठी तालिबानवर हल्ला करत आहेत.

### न्यायाचा संघर्ष की विनाशाचा मार्ग?

पाकिस्तान या मोहिमेला 'न्यायासाठी उचललेले पाऊल' म्हणत असला तरी, यामुळे देशात मोठी अनिश्चितता निर्माण झाली आहे. दोन्ही देशांमधील दशकांपासून असलेला तणाव आता सर्वात घातक वळणावर आला आहे. आता प्रश्न हाच उरतो की, हा संघर्ष येथेच थांबणार की याचे रूपांतर एका मोठ्या युद्धात होऊन भीषण विनाश ओढवणार?

# केजरीवालांची निर्दोष मुक्तता होताच भाजपाला दिलं खुलं आव्हान

महाईन्यूज । नवी दिल्ली

**दिल्लीतील कथित मद्य घोटाळा प्रकरणात दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांची राऊज एव्हेन्यू न्यायालयाने आज निर्दोष मुक्तता केली. त्यामुळे अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांना मोठा दिलासा मिळाला. न्यायालयाच्या निर्णयानंतर केजरीवाल यांनी प्रतिक्रिया देत आपण भ्रष्टाचारी नाहीत, तर इमानदार आहोत असं म्हटलं.**



दिल्लीतील कथित मद्य घोटाळा प्रकरणात न्यायालयाने निर्दोष मुक्तता केल्यानंतर आज सायंकाळी अरविंद केजरीवाल यांनी पत्रकार परिषद घेत थेट भाजपाला खुलं आव्हान दिलं. ‘दिल्लीत आता निवडणूक घ्या, भाजपाच्या १० पेक्षा अधिक जागा निवडून आल्या तर मी राजकारण सोडेन’, असं अरविंद केजरीवाल यांनी म्हटलं आहे.

“दिल्लीतील कथित मद्य घोटाळा प्रकरणाचा हा खटला सर्वात मोठा राजकीय कट होता. जो दिल्लीतील आम आदमी पक्षाला सत्तेवरून हटवण्यासाठी भाजपाने रचला होता. पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांनी आम आदमी पक्षाला संपवण्यासाठी आणि पक्षाला बदनाम करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनी आम आदमी पक्षाला संपवण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा देशाच्या हितासाठी काम करावं. सत्तेसाठी कोणीही देश आणि संविधानाशी अशा प्रकारे खेळू नये. पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देशाची माफी मागितली पाहिजे”, असंही केजरीवाल म्हणाले आहेत.

### अरविंद केजरीवाल काय म्हणाले?

दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर जोरदार टीका केली. अरविंद केजरीवाल यांनी म्हटलं की, “दिल्लीत भाजपा सत्तेत आल्यापासून दिल्लीकरांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. संपूर्ण दिल्ली उद्ध्वस्त झाली आहे. पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांच्या सत्तेच्या लालसेचे परिणाम दिल्लीतील तीन कोटी जनतेला भोगावे लागत आहेत. दिल्लीतील लोकांना जाऊन विचारा. आज मी मोदींना आव्हान देतो, जर तुमच्यात हिंमत असेल तर दिल्लीत पुन्हा निवडणुका घ्या. तुम्हाला १० पेक्षा जास्त जागा मिळाल्या तर मी राजकारण सोडेन. दिल्लीतील लोक तुम्हाला कंटाळले आहेत”, अशा शब्दांत अरविंद केजरीवालांनी भाजपावर टीका केली. २०२२ मध्ये दिल्ली मद्य धोरणात गैरप्रकार झाल्याचा आरोप अरविंद केजरीवाल आणि यांच्याविरोधात करण्यात आला होता.

## सोनम कपूर कडून सासूला खास शुभेच्छा



बॉलीवूड अभिनेत्री सोनम कपूर ज्येष्ठ अभिनेते अनिल कपूर यांची मुलगी असली तरी तिने इंडस्ट्रीत स्वतःची ओळख निर्माण केली आहे. सध्या ती फारशी चित्रपटांमध्ये दिसत नसली तरी खाजगी आयुष्यामुळे नेहमी चर्चेत असते. ती नेहमी तिच्या चाहत्यांशी सोशल मीडियाच्या माध्यमातून संपर्कात असते. नुकतीच तिने सोशल मीडियावरून एक खास पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये सोनमने तिच्या सासूला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. सोनम कपूर सध्या तिच्या दुसऱ्या गरोदरपणामुळे चर्चेत आहे. तिने तिची सासू प्रिया आहुजा यांना खास पद्धतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. सोशल मीडियावर अभिनेत्रीने एक खास पोस्ट शेअर करत या पोस्टमध्ये कुंटुंबात सासूची भूमिका किती महत्वाची आहे, याचा उल्लेख करत सासू प्रिया आहुजा यांना वाढदिवसाच्या खास पद्धतीने शुभेच्छा दिल्या आहेत. सोनम कपूरने इंस्टाग्रामवर काही फोटो शेअर केले आहेत. यामधील एका फोटोमध्ये ती तिची सासू प्रिया आहुजा आणि तिचा पती आनंद आहुजा यांच्यासोबत बसलेली दिसत आहे. या फोटोच्या कॅप्शनमध्ये सोनमने "सर्वात गोड आजी आणि आईला वाढदिवसाच्या शुभेच्छा. तुमच्या प्रेमाने या कुटुंबाला सुंदरपणे एकत्र ठेवले आहे.

## थलापथी विजयचा 5 वर्षांचा संसार मोडणार



तमिळ चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार आणि 'तमिळगा वेत्री कळघम' (TVK) पक्षाचे प्रमुख VIJAY सध्या त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आले आहेत. त्यांच्या पत्नी SANGEETHA SORNALINGAM यांनी चेंगलपट्टू येथील कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज दाखल केल्याची माहिती समोर आली आहे. अर्जामध्ये वैवाहिक मतभेद आणि गेल्या काही वर्षांपासून वाढत गेलेला दुरावा यांचा उल्लेख करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. विजय आणि संगीता मागील दोन वर्षांपासून वेगळे राहत असल्याचीही चर्चा आहे, त्यामुळे हा निर्णय अचानक नसून विचारांती घेतल्याचे मानले जात आहे. काही वृत्तांमध्ये विजय यांच्यावर एका लोकप्रिय अभिनेत्रीसोबत विवाहबाह्य संबंध असल्याचा आरोप करण्यात आल्याची चर्चा रंगली असली तरी याबाबत कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही. या प्रकरणाची पहिली सुनावणी २० एप्रिल रोजी होणार असून, सुरुवातीला न्यायालयाकडून समेटाचा प्रयत्न केला जाणार आहे. तो निष्फळ ठरल्यास पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू होईल. विजय आणि संगीता यांचा विवाह १९९९ साली झाला होता. संगीता या मूळच्या श्रीलंकन तमिळ असून त्या विजय यांच्या चाहत्या होत्या. या दांपत्याला जेसन संजय आणि दिव्या साशा अशी दोन मुले आहेत. 'घिली', 'मर्सल', 'बीस्ट' आणि 'लिओ' यांसारख्या चित्रपटांमधून विजय यांनी मोठी लोकप्रियता मिळवली असून अलीकडेच त्यांनी राजकारणात सक्रिय प्रवेश करत TVK पक्षाची स्थापना केली आहे. त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील या घडामोडींचा त्यांच्या सार्वजनिक आणि राजकीय प्रतिमेवर काही परिणाम होतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे; मात्र दोन्ही बाजूंनी अधिकृत निवेदन येणे अद्याप बाकी आहे.



## सलमानला नकार; डेझी शाहचा धक्कादायक खुलासा

बॉलीवूड अभिनेता SALMAN KHAN यांना 'नाही' म्हणण्याचं धाडस केल्याचा खुलासा अभिनेत्री DAISY SHAH हिने अलीकडेच एका मुलाखतीत केला आहे. डेझी २००० च्या सुरुवातीपासून चित्रपटसृष्टीत सक्रिय असली तरी २०१४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'जय हो' चित्रपटात सलमान खानसोबत मुख्य भूमिका साकारल्यानंतरच तिला व्यापक ओळख आणि लोकप्रियता मिळाली. मात्र, तिला सलमानच्या चित्रपटाची ऑफर पहिल्यांदाच तेव्हा मिळाली नव्हती, हे अनेकांना ठाऊक नव्हते. २०११ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'बॉडीगार्ड' चित्रपटासाठी तिला विचारणा करण्यात आली होती; परंतु काही ठोस कारणांमुळे तिने ती ऑफर नाकारण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामागचं नेमकं कारण काय होतं आणि नकार दिल्यानंतर तिच्या मनात कोणती भीती निर्माण झाली होती, याबद्दल तिने स्पष्टपणे भाष्य केले आहे.अभिनेत्री म्हणून पूर्णवेळ काम करण्यापूर्वी डेझी ही प्रसिद्ध कोरिओग्राफर GANESH ACHARYA यांची सहाय्यक म्हणून काम करत होती. 'बॉलीवूड हंगामा'ला दिलेल्या मुलाखतीत ती म्हणाली की, असिस्टंट कोरिओग्राफर म्हणून काम करताना ती दररोज सुमारे ५,००० रुपये मानधन मिळवत होती. काही महिन्यांत फक्त दहा दिवस शूटिंग असायचे, तर काही वेळा सलग ३० दिवसही काम करावे लागायचे. त्यामुळे तिचा चित्रपटसृष्टीतील प्रवास हा टप्प्याटप्प्याने आणि मेहनतीच्या जोरावर घडत गेला. २००१ पासून ती सिनेविश्वात कार्यरत असून तिने कन्नड चित्रपटसृष्टीतही नशीब आजमावले. त्याचबरोबर अनेक गाण्यांमध्ये झळकत तिने आपली नृत्यकला सिद्ध केली.याच काळात सलमान खानने तिला 'बॉडीगार्ड' चित्रपटातील एका महत्त्वाच्या भूमिकेची ऑफर दिली होती. डेझीने स्पष्ट केले की तिने त्या चित्रपटासाठी कधीच ऑडिशन दिले नव्हते; मात्र 'जय हो'साठी तिने ऑडिशन दिले होते. एका दाक्षिणात्य चित्रपटात काम करत असताना ती मुंबईत आली आणि गणेश आचार्य यांना भेटली. मोकळ्या वेळेत ती त्यांच्यासोबत विविध प्रोजेक्ट्सवर काम करत असे. त्यानंतर 'दबंग' चित्रपटातील एका गाण्याच्या शूटिंगदरम्यान तिची सलमान खान यांच्याशी प्रत्यक्ष भेट झाली आणि तेथूनच संवादाची सुरुवात झाली.त्या भेटीत तिने सलमानला सांगितले की ती सध्या दक्षिणेकडील चित्रपटसृष्टीत काम करत आहे. त्यावेळी सलमान 'बॉडीगार्ड'साठी अभिनेत्रीच्या शोधात होते आणि त्यांनी हेझल कीचने साकारलेली भूमिका डेझीला ऑफर केली. मात्र डेझीला ती भूमिका स्वीकारायची नव्हती. तिच्या मते, जर सलमान खानसोबत काम करण्याची संधी मिळत असेल, तर त्यांच्यासोबत थेट स्क्रीन शेअर करण्याची आणि ठळक भूमिका करण्याची इच्छा तिची होती. डान्सच्या पार्श्वभूमीतून आलेल्या डेझीला स्वतःचे नृत्यकौशल्य प्रभावीपणे दाखवता येईल अशी भूमिका हवी होती. त्यामुळेच तिने विचारपूर्वक ती ऑफर नाकारली.'बॉलीवूड नाऊ'ला दिलेल्या मुलाखतीत डेझीने मान्य केले की सलमानसारख्या मोठ्या स्टारला नकार देणे अजिबात सोपे नव्हते. "आता माझी मोठी संधी हातची गेली असेल, असे मला वाटले. कारण त्यांना 'नाही' म्हणण्याची हिंमत फार कमी जण करतात. तरीही मी धाडस करून तो निर्णय घेतला," असे ती म्हणाली. मात्र दीड वर्षांनंतर सलमान खानने पुन्हा तिच्याशी संपर्क साधला आणि 'जय हो'साठी ऑडिशन देण्यास सांगितले. अखेरीस तिला ती भूमिका मिळाली आणि या चित्रपटाने सुमारे १९० कोटी रुपयांची कमाई करत बॉक्स ऑफिसवर मोठे यश संपादन केले.

# क्रिकेटपटू रिंकू सिंगच्या वडिलांचे निधन

## स्टेज ४ यकृताच्या कर्करोगाशी झुंज देत अखेर निधन; कुटुंबावर दु:खाचा डोंगर

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारतीय क्रिकेटपटू रिंकू सिंग याचे वडील, खानचंद सिंग यांचे शुक्रवारी निधन झाले आहे. स्टेज ४ यकृताच्या कर्करोगाशी दीर्घकाळ झुंज दिल्यानंतर निधन झाले. माजी भारतीय फिरकीपटू हरभजन सिंग याने सोशल मीडियावर पोस्ट करत याबद्दल माहिती दिली आहे. खानचंद सिंग यांच्यावर ग्रेटर नोएडा येथील यथार्थ हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते.**



या आठवड्याच्या सुरुवातीलाच RINKU SINGH यांच्या वडिलांची प्रकृती अचानक खालावल्यामुळे डॉक्टरांना त्यांना तातडीने व्हेंटिलेटरवर ठेवण्याचा निर्णय घ्यावा लागला होता. त्यांच्या प्रकृतीत अपेक्षित सुधारणा होत नसल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली होती. वडिलांच्या गंभीर आजारपणामुळे २८ वर्षीय रिंकू सिंगने चेन्नईच्या M. A. CHIDAMBARAM STADIUM येथे झालेल्या झिम्बाब्वेविरुद्धच्या टी२० वर्ल्डकप २०२६ सुपर ८ सामन्यापूर्वी तातडीने घरी जाण्याचा निर्णय घेतला होता. कुटुंबासोबत काही काळ घालवल्यानंतर आणि परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर तो सामना सुरू होण्यापूर्वी पुन्हा संघात दाखल झाला; मात्र अंतिम प्लेईंग इलेव्हनमध्ये त्याला स्थान मिळाले नाही. त्याच्या जागी संघ व्यवस्थापनाने SANJU SAMSON यांना संधी दिली होती.

दरम्यान, सोशल मीडियावर पोस्ट करत माजी भारतीय फिरकीपटू HARBHAJAN SINGH यांनी रिंकू आणि त्याच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या. टी२० विश्वचषकासारख्या मोठ्या स्पर्धेदरम्यान रिंकू आपली व्यावसायिक जबाबदारी पार पाडत असला, तरी वैयक्तिक आयुष्यातील हा प्रसंग त्याच्यासाठी आणि त्याच्या संपूर्ण कुटुंबासाठी अत्यंत वेदनादायी आणि कठीण असल्याची जाणीव असल्याचे त्यांनी नमूद केले. “रिंकू सिंगचे वडील श्री खानचंद सिंगजी यांच्या निधनाचे वृत्त ऐकून अत्यंत दुःख झाले. तो टी२० विश्वचषकादरम्यान आपल्या जबाबदाऱ्या निभावत असला तरी हा काळ निश्चितच रिंकू आणि त्याच्या कुटुंबासाठी खूप कठीण असणार आहे,” असे हरभजन यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. पुढे त्यांनी, “माझ्या संवेदना आणि प्रार्थना रिंकू व त्याच्या प्रियजनांसोबत आहेत. वाहेगुरु निघून गेलेल्या आत्म्यास चिरशांती देवो आणि शोकाकूल कुटुंबाला हे दुःख सहन करण्याची शक्ती व धैर्य प्रदान करो,” अशा शब्दांत श्रद्धांजली वाहिली.

रिंकू सिंग यांच्या क्रिकेट कारकिर्दीच्या जडणघडणीत त्यांच्या वडिलांचे मोलाचे आणि प्रेरणादायी योगदान राहिले आहे. अलीगड येथे एलपीजी सिलेंडर वितरणाचे काम करून त्यांनी कुटुंबाचा उदरनिर्वाह केला. आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची आणि मर्यादित साधनसंपत्तीची असतानाही त्यांनी मुलाच्या क्रिकेटच्या स्वप्नांना कधीही आड येऊ दिले नाही. उलट, आवश्यक ते सर्व साहित्य, प्रशिक्षण आणि संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी मोठ्या त्यागाची तयारी ठेवली. गेल्या वर्षी कृतज्ञतेपोटी रिंकू सिंगने आपल्या वडिलांना सुमारे ३.१९ लाख रुपये किमतीची KAWASAKI NINJA ही आकर्षक बाईक भेट दिली होती, ज्यामुळे त्यांच्या नात्यातील आपुलकी आणि आदर अधिक अधोरेखित झाला होता.

# वर्ल्ड चॅम्पियन टीम इंडियाचा वनडे मालिकेत पराभव

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारताचा महिला संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असून दोन्ही संघांमध्ये मल्टीफॉरमॅट सिरीज खेळवली जात आहे. टी-२० मालिका आपल्या नावे केल्यानंतर आता वनडे मालिकेत वर्ल्ड चॅम्पियन असलेल्या भारतीय महिला संघाला पराभवाला सामोरं जावं लागलं आहे. दुसऱ्या वनडे सामन्यात टीम इंडियाचा ऑस्ट्रेलियाने विकेट्सने पराभव केला. यासह मालिकेतील सुरूवातीचे दोन्ही सामने जिंकत मालिका आपल्या नावे केली आहे.**




भारत आणि ऑस्ट्रेलिया संघांमध्ये होत असलेल्या या मल्टी फॉरमॅट मालिकेत आता टीम इंडिया गुणांच्या फरकात मागे पडली आहे. दुसऱ्या वनडे सामन्यानंतर आता ऑस्ट्रेलिया ६ आणि भारत ४ अशा गुणांवर आहे. भारताने टी-२० मालिकेतील फक्त २ सामने जिंकले आहेत. तर ऑस्ट्रेलियाने एक टी-२० आणि २ वनडे सामने जिंकले आहेत. एका टी-२० आणि वनडे सामना विजेत्या संघाला २ गुण मिळणार आहेत.

भारताने दिलेल्या २५२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाने एलिसा हिलीच्या रूपात मोठी विकेट गमावली. पण यानंतर फिबी लिचफिल्ड व जॉर्जिया वॉल यांनी संघाची धुरा सांभाळली. या दोघींनी दुसऱ्या विकेटसाठी ९४ चेंडूत ११९ धावांची भागीदारी रचली. लिचफिल्ड ६२ चेंडूत ११ चौकार व एका षटकारासह ८० धावा करत बाद झाली. तर जॉर्जिया वॉलने ८२ चेंडूत १३ चौकार व एका षटकारासह १०१ धावा करत शतकी खेळी केली. तर बेथ मुनी ३१ धावा करत माघारी परतली. यानंतर एश्ले गार्डनरने विजयी चौकार मारत संघाला ३६.१ षटरांत २५२ धावांचं आव्हान पार करून दिलं.

भारताकडून दीप्ती शर्मा व काश्वी गौतम यांनी २-२ विकेट्स घेतल्या. तर क्रांती गौडने एक विकेट घेतली. आता तिसरा वनडे सामना १ मार्चला होणार आहे. या सामन्यात विजय मिळवण्याच्या उद्देशाने भारतीय संघ उतरेल.

भारताने दुसऱ्या सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. पण भारतीय संघ २५१ धावा करू शकला. प्रतिका रावल व स्मृतीने संघाला सावध सुरूवात करून दिली. पण संघ मोठी धावसंख्या उभारू शकला नाही. प्रतिका रावलने दुखापतीनंतर पुनरागमन करत ८१ चेंडूत ६ चौकारांसह ५२ धावांची खेळी केली. तर स्मृती मानधना ३१ धावा व जेमिमा ११ धावा करत बाद झाली. यानंतर हरमनप्रीत कौरने संघाच्या डावाची धुरा सांभाळली. कर्णधार हरमनने ७० चेंडूत ५४ धावा केल्या. तर खालच्या फळीत अमनजोतने १३ धावा, रिचा घोषने २२ धावा तर काश्वी गौतमने २५ धावांचं योगदान दिलं. तर गोलंदाज क्रांती गौडने ३ चौकारांसह १९ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. याशिवाय वैष्णवी शर्माने ५ चेंडूत २ चौकारांसह १० धावा केल्या आणि संघाला २५१ धावांचा आकडा गाठून दिला. ऑस्ट्रेलियाकडून एनाबेल सदरलँड, एलाना किंग व एश्ले गार्डनर यांनी प्रत्येकी २-२ विकेट्स घेतल्या. तर मेगन शट व निकोला कॅरे यांनी १-१ विकेट्स घेतल्या.


स्मार्ट PCMC
SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज ™
ePaper
। शनिवार ।
दि. 28 फेब्रुवारी 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# जिल्हा रुग्णालयाची क्षमता वाढणार

## आमदार शंकर जगताप यांची लक्षवेधी; आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचे आश्वासन

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पुणे जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे बळकटीकरण करण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. सांगवी येथील पुणे जिल्हा रुग्णालयातील आयसीयू बेडची संख्या वाढविण्यासोबतच नवजात शिशु अतिदक्षता विभाग ('एसएनसीयू') बेड चे संख्या वाढवण्या बाबत आश्वासन आरोग्य राज्यमंत्री मा. मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांनी विधानसभेत दिले. चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी दरम्यान त्यांनी ही माहिती दिली.**



> जिल्हा रुग्णालय, सांगवी हे संपूर्ण जिल्ह्यासाठी महत्त्वाचे आरोग्य केंद्र आहे. मात्र, येथील आयसीयू बेडची कमतरता आणि एनआयसीयू सुविधेचा अभाव यामुळे गरीब रुग्णांची मोठी गैरसोय होत होती. विशेषतः नवजात बालकांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात न्यावे लागणे हे क्लेशदायक आहे. तसेच, 'कंत्राटी संस्था रुग्णालयात चाचण्या उपलब्ध असताना रुग्णांना बाहेर पाठवून त्यांची लूट करत असतील, तर ते आम्ही कदापि सहन करणार नाही. सामान्य माणसाच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अशा संस्थांची सखोल चौकशी करून त्यांचे कंत्राट रद्द करावे आणि त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी, हीच आमची आग्रही मागणी आहे. सरकारने आता बेडची संख्या वाढविण्याचे आणि सुपर स्पेशालिटी दर्जा देण्याचे जे आश्वासन दिले आहे, त्याची तातडीने अंमलबजावणी व्हावी यासाठी माझा सातत्याने पाठपुरावा सुरू राहील."
>
> \- शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा.

अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान आमदार शंकर जगताप यांनी आरोग्य सेवांच्या दुरावस्थेकडे सभागृहाचे लक्ष वेधले. सांगवी येथील जिल्हा रुग्णालयातील सध्याची स्थिती समाधानकारक नसल्याचे सांगत, त्यांनी तेथील अतिदक्षता विभागाची क्षमता वाढविण्याची गरज व्यक्त केली. विशेषतः ग्रामीण भागातील रुग्णांना आणि लहान बालकांना वेळेवर उपचार मिळावेत, यासाठी ग्रामीण रुग्णालयांमध्ये 'एनआयसीयू सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची आग्रही मागणी त्यांनी मांडली. यावेळी या रुग्णालयातील CT SCAN व MRI सारख्या वैद्यकीय सुविधा देणाऱ्या युनिक वेलनेस या बाह्य कंत्राटदार संस्थेबद्दल बोलताना आमदार जगताप यांनी एका गंभीर मुद्द्याकडे लक्ष वेधले. रुग्णालयातील वैद्यकीय चाचण्यांचे कंत्राट मागील वर्षभरापासून 'युनिक वेलनेस' या संस्थेकडे आहे. नियमानुसार या सर्व चाचण्या रुग्णालयात होणे बंधनकारक असताना, रुग्णांना विनाकारण MRI करण्याकरिता बाहेर पाठवले जात असल्याची तक्रार त्यांनी केली. ही बाब रुग्णांसाठी आर्थिक आणि मानसिक त्रासाची असून, या गैरप्रकाराला जबाबदार असणाऱ्या संस्थेवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

आमदार जगताप यांच्या प्रश्नांना उत्तर देताना आरोग्य राज्यमंत्री मा. मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांनी महत्त्वपूर्ण घोषणा केल्या. त्या म्हणाल्या सांगवीतील पुणे जिल्हा रुग्णालयातील आयसीयू बेडची संख्या आता ६ वरून १४ करण्यात आली आहे. लवकरच बालकांसाठी एनआयसीयू बेड सुरू करण्यात येतील. सांगवी येथे २०० बेड क्षमतेचे नवीन सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव असून, यामुळे जिल्हा रुग्णालयाची क्षमता प्रमाणात वाढणार आहे. रुग्णालयातील कंत्राटी ' संस्थेबाबत आलेल्या तक्रारींची सखोल चौकशी केली जाईल. तपासात दोषी आढळल्यास संस्थेवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे आश्वासन मंत्र्यांनी दिले.

# पिंपळे सौदागरमध्ये शिव छत्रपती लिनिअर गार्डन परिसर "चकाचक"

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पिंपळे सौदागर येथील शिव छत्रपती लिनिअर गार्डन परिसरातील वाढत्या अस्वच्छतेच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले आहेत. फुटपाथ लगत व प्लाझा परिसरात झाडांच्या पानगळतीमुळे मोठ्या प्रमाणात कचरा साचत असल्याबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत होत्या.**





नागरिकांच्या समस्या सोडवण्यास प्राधान्य देत शत्रुघ्न काटे यांनी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाशी त्वरित संपर्क साधून साफसफाई मोहीम राबवण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. त्यांच्या पाठपुराव्यामुळे पालिका प्रशासनाने तत्काळ हालचाल करत लिनिअर गार्डन परिसरातील फुटपाथ व प्लाझा भागात स्वच्छता मोहिमेला सुरुवात केली आहे. या उपक्रमात नगरसेविका सौ. अनिताताई काटे व नगरसेविका सौ. कुंदाताई भिसे यांनीही सहकार्य केले. मात्र या संपूर्ण मोहिमेच्या केंद्रस्थानी शत्रुघ्न (बापू) काटे यांचा ठाम पाठपुरावा आणि प्रशासनाशी सातत्यपूर्ण समन्वय राहिला.

"परिसर स्वच्छ, सुरक्षित आणि सुस्थितीत ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. पालिकेने नियमित व सातत्याने स्वच्छता ठेवावी, तसेच नागरिकांनीही परिसर स्वच्छ राखण्यासाठी सहकार्य करावे," असे आवाहन शत्रुघ्न काटे यांनी केले. या स्वच्छता उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना दिलासा मिळाला असून स्थानिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. नागरिकांच्या तक्रारींना तत्पर प्रतिसाद देत प्रत्यक्ष कृतीतून समस्या सोडवण्याचा शत्रुघ्न (बापू) काटे यांचा प्रयत्न पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.



> "पिंपळे सौदागरमधील प्रत्येक परिसर स्वच्छ, सुरक्षित आणि सुंदर ठेवणे ही आमची प्राथमिक जबाबदारी आहे. नागरिकांनी मांडलेल्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करणे आणि भविष्यात अशा समस्या उद्भवू नयेत यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करणे, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. प्रशासन आणि नागरिकांच्या सहकार्याने आपला परिसर आदर्श बनवू."
>
> \- शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा.

# कुसुमाग्रजांच्या जयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग...

## संत साई विद्यालयात 'मराठी राजभाषा गौरव दिन' उत्साहात साजरा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**संत साई विद्यालयात आज (दि. २७ फेब्रुवारी २०२६) शाळेच्या प्रांगणात 'मराठी राजभाषा गौरव दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन मराठी विभागातर्फे करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली.**



मराठी दिन हा ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. कार्यक्रमाची प्रस्तावना व सूत्रसंचालन श्री. भागवत वानखेडे सर यांनी केले. विद्यार्थिनी आराध्या उत्तुरे हिने सादर केलेल्या "लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी" या गीताने कार्यक्रमाची रंगत वाढली.

मराठी विषयाच्या शिक्षिका सौ. शुभांगी सुतार यांनी आपल्या भाषणातून मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांना भाषेचा अभिमान बाळगण्याचे आवाहन केले. केंद्र सरकारने मराठी भाषेच्या प्राचीनत्व व समृद्ध परंपरेची दखल घेत तिला अभिजात भाषेचा दर्जा बहाल केल्याचा उल्लेखही त्यांनी यावेळी केला.

यानंतर इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी श्रावणी देवकर हिने अभंग गायन सादर केले. तसेच इयत्ता आठवीतील तनिष्का रसाळ आणि इयत्ता सातवीतील अन्वी फुगे व स्वामिनी घोडेकर यांनी स्वरचित कवितांचे प्रभावी वाचन केले.

शाळेचे मुख्याध्यापक श्री. शिवलिंग ढवळेश्वर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मराठी ही आपली मातृभाषा असून तिचा अभिमान प्रत्येक विद्यार्थ्याने बाळगला पाहिजे, असे सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली.

या कार्यक्रमाला मुख्याध्यापिका सौ. सुनीता ढवळेश्वर, विश्वस्त पायल ढवळेश्वर, सौ. रुपाली खोल्लम मॅडम, सौ. भारती ढवळेश्वर मॅडम, मनोज वाबळे सर, विठ्ठल पुंडे सर, संजय अनार्थे सर व अक्षय राणे सर यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शिक्षिका स्वाती गोसावी यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### मराठी राजभाषा गौरव दिन साजरा

२७ फेब्रुवारी रोजी संत साई विद्यालय, पिंपरी येथे 'मराठी राजभाषा गौरव दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात गीत, अभंग व कवितांचे सादरीकरण झाले. मराठी भाषेचा अभिमान बाळगण्याचा संदेश देत सहभागी विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली.

---

## डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन व ग्रीन ग्रोथवर पाचवी आंतरराष्ट्रीय परिषद

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणे यांच्या अधिपत्याखालील ग्लोबल बिझनेस स्कूल अँड रिसर्च सेंटर (GBSRC) येथे दि. २६ व २७ फेब्रुवारी रोजी "डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन अँड ग्रीन ग्रोथ" या समकालीन विषयावर पाचवी आंतरराष्ट्रीय परिषद उत्साहात पार पडली. देश-विदेशातील शिक्षणतज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील मान्यवर, धोरणकर्ते व संशोधकांना एकाच व्यासपीठावर आणण्यात परिषद यशस्वी ठरली.**



दोन दिवसीय परिषदेतील चर्चासत्रांमध्ये नवोन्मेष, शाश्वत विकास, सुशासन आणि डिजिटल परिवर्तनाच्या माध्यमातून समावेशक व शाश्वत जागतिक अर्थव्यवस्था उभारण्यावर सखोल विचारमंथन झाले. सादर व स्वीकृत संशोधन निबंध टेलर अँड फ्रान्सिसच्या स्कोपस-सूचीबद्ध परिषद कार्यवृत्तात प्रकाशित होणार असल्याने संशोधकांना आंतरराष्ट्रीय शैक्षणिक दृश्यमानता मिळणार आहे.

परिषदेत १२ देशांचा सहभाग, १३५ संशोधन निबंधांचे सादरीकरण, २६ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांची उपस्थिती आणि ३५० हून अधिक संशोधक, उद्योगतज्ज्ञ व विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविण्यात आला. त्यामुळे परिषद जागतिक स्तरावरील शैक्षणिक मेळावा ठरली.

Dr. D.Y. PATIL VIDYAPEETH, PUNE
(Deemed to be University)

उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांनी तंत्रज्ञान, व्यवसाय आणि सार्वजनिक धोरण यांच्या संगमावर संवाद घडवून आणण्याची विद्यापीठाची भूमिका अधोरेखित केली. सचिव व प्र-कुलगुरू डॉ. स्मिता जाधव यांनी आयटीसीच्या 'ई-चौपाल' मॉडेलचा संदर्भ देत तंत्रज्ञानाद्वारे शेतकरी सक्षमीकरणाचा मुद्दा मांडला. आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेट्री यांनी ३डी प्रिंटिंग व कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील भारताच्या संधींबाबत मत व्यक्त केले. महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील यांनी जिल्हास्तरीय नवकल्पना केंद्रांच्या गरजेवर भर दिला, तर TEMPLE UNIVERSITY ROME येथील प्रा. बर्नार्डो निकोलेटी यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या भविष्यवेधी व जनरेटिव्ह क्षमतांवर मार्गदर्शन केले.

परिषदेचे अध्यक्ष डॉ. सचिन वेर्णेकर आणि संयोजक डॉ. मनीष सिन्हा यांनी संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांशी सुसंगत संशोधन व बहुविध सहकार्याची गरज अधोरेखित केली. या यशस्वी आयोजनातून GBSRCने शैक्षणिक उत्कृष्टता, जागतिक सहकार्य आणि शाश्वत विकासाभिमुख संशोधनाची बांधिलकी पुन्हा दृढ केली.

### पाचवी आंतरराष्ट्रीय परिषद उत्साहात

पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुण्याच्या ग्लोबल बिझनेस स्कूल अँड रिसर्च सेंटरमध्ये "डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन अँड ग्रीन ग्रोथ" विषयावर पाचवी आंतरराष्ट्रीय परिषद यशस्वीपणे पार पडली. १२ देशांचा सहभाग, १३५ संशोधन निबंधांचे सादरीकरण व ३५० हून अधिक संशोधक-तज्ज्ञांच्या उपस्थितीत डिजिटल परिवर्तन, शाश्वत विकास व हरित वाढीवर सखोल विचारमंथन झाले.

# Double Achievement for Priyadarshani School, Moshi


## Grade 4's Purvi Dominates Karate, Grade 2's Devansh Secures State Gold

**MahaEnews** I PIMPRI-CHINCHWAD

**PRIYADARSHANI SCHOOL MOSHI, PROUDLY ANNOUNCES THAT GRADE 4 STUDENT PURVI CHAVAN HAS BROUGHT GREAT HONOR TO THE SCHOOL BY WINNING AT THE STATE LEVEL INVITATIONAL KARATE CHAMPIONSHIP. SHE HAS ALSO SECURED TOP POSITION AT THE DISTRICT LEVEL KARATE CHAMPIONSHIP, SHOWCASING EXCEPTIONAL SKILL, DISCIPLINE, AND DEDICATION.**

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE




Grade 2 student Devansh Pawar has achieved remarkable success by winning the Gold Medal at the State Level Invitational Abacus Championship. His outstanding performance reflects sharp mental ability, focus, and consistent practice.

The school management and Principal congratulated Purvi and Devansh for their outstanding achievement and wished her continued success in future competitions. This accomplishment reflects the school's commitment to nurturing talent in academics as well as sports.

# Thick Smoke After Fire at Dump Yard Near Mula-Mutha River

**MahaEnews** I PUNE

**A MAJOR FIRE ERUPTED ON FRIDAY MORNING IN HEAPS OF GARBAGE DUMPED ALONG THE RIVERBED OF THE MULA-MUTHA RIVER AT LONI-KALBHOR IN HAVELI TALUKA, TRIGGERING DENSE PLUMES OF SMOKE THAT SPREAD ACROSS NEARBY AREAS AND CAUSED BREATHING DIFFICULTIES AMONG RESIDENTS. FIRE BRIGADE PERSONNEL BATTLED THE BLAZE FOR SEVERAL HOURS, WITH EFFORTS CONTINUING TILL LATE EVENING.**



According to local sources, the waste had allegedly been dumped in the riverbed by the Loni-Kalbhor and Kadamwakvasti gram panchayats. With no designated land available for scientific waste processing or storage, nearly 30 to 35 trolley-loads of garbage are reportedly being deposited in the riverbed daily. Over time, large mounds of waste have accumulated, emitting a persistent foul odour and posing environmental risks.

Friday's fire led to the release of thick, toxic smoke, engulfing nearby residential pockets. Residents complained of eye irritation, throat discomfort and respiratory distress. The situation has raised particular concern as several educational institutions operate in the vicinity, potentially affecting thousands of students.

The incident has once again brought attention to waste management lapses in the area. Despite nationwide cleanliness and river conservation drives under initiatives such as the Swachh Bharat Abhiyan, local residents allege that dumping and subsequent burning of garbage in the riverbed has occurred repeatedly. Similar fire incidents have reportedly taken place in the past, often attributed to unidentified persons. Environmental activists warned that the unchecked dumping is contributing not only to severe air pollution but also to water contamination. Pollution of the river threatens aquatic life and further degrades the ecological health of the region.

Residents have demanded a thorough inquiry into the incident, strict action against those responsible, and the immediate establishment of a sustainable solid waste management system. They have also urged district authorities to allocate a separate site for scientific waste processing and to halt the direct dumping of garbage into the riverbed, which is considered Pune's lifeline.

PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI

# Balancing Sports and Academics for All-Round Development

## ADMISSIONS OPEN

Grade Nursery to Grade XII



## WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?

43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation

+91 9890613333 | +91 9373073077

pgosm05@gmail.com www.priyadarshanischoolmoshi.in